महाराष्ट्र शासन
समाज कल्याण विभाग,जिल्हा परिषद नांदेड.
दुरध्वनी क्र. 02462-245100 ई-मेल:- dswozpnanded1@gmail.com
वेबसाईट :-www.zpnanded.in पिनकोड :- 431601

जा.क्र./जिपनां/सकवि/अजानबौघववी/प्रमा/२०२५-२६/ E-3068116 दि.06/02/2026

**शासकिय मान्यता आदेश**

१. शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक विमाप-१०९८/ प्र.क्रं. २८, दिनांक १९ ऑगस्ट १९९९.
२. महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-२००८/प्र.क्र. ४७२/ वित्त-९(३३) मंत्रालय, मुंबई- ३२ दिनांक ०९ फेब्रुवारी २००९.
३. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-२००९/ प्र.क्रं. १२३/पंरा-७, दिनांक ३० ऑक्टोंबर २००९
४. महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक:- दवसु-२०११/प्र.क्र. ४४२/अजाक/मंत्रालय विस्तार भवन मुंबई ४०००३२ दिनांक ५.१२.२०११
५. महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक :- दवसु-२०११/ प्र.क्र.४४२ /अजाक /मंत्रालय विस्तार भवन मुंबई ४०००३२ दिनांक ३१.१२.२०११
६. महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक :-दवसु-२०११/प्र.क्र.४४२/अजाक- १/मंत्रालय विस्तार भवन मुंबई ४०००३२ दिनांक २.७.२०१२
७. महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन शुध्दीपत्रक क्रमांक :- दवसु- २०११/प्र.क्र.४४२/अजाक-१/मंत्रालय विस्तार भवन मुंबई ४०००३२ दिनांक २०.१२.२०१२
८. महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, निर्णय क्रमांक दवसु-२०१३/प्र.क्रं.८५/अजाक-१, दिनांक ०१ ऑगष्ट २०१३
९. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए-२०१५/प्र.क्र.१०/वित्त-०९, दिनांक २५ मार्च २०१५.
१०. आयकर अधिनियम १९६१ चे कलम १९४ (क)
११. महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक दवसु/२०१५/प्र.क्र.५९/अजाक-१ दिनांक २७ मे २०१५.
१२. महाराष्ट्र शासन, शुध्दीपत्रक सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक दवसु/२०१५/प्र.क्र.५९/अजाक-१ दि. ८ मार्च २०१६.
१३. महाराष्ट्र शासन, शुध्दीपत्रक सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक दवसु/२०२१/प्र.क्र.७९/अजाक, दि-०६ ऑक्टो २०२१.
१४. अर्थसंकल्पीय अंदाजपत्र सन २०२५-२६.
१५. महाराष्ट्र शासन, ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्र.पटिदे-२०२१/प्र.क्र.३८/वित्त-२ दिनांक-०८ डिसेंबर, २०२१.
१६. महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शा. निर्णय क्र. संकिर्ण-२०२१/प्र.क्र. १०६/अजाक दिनांक १६ डिसेंबर, २०२१
१७. मा.प्रादेशिक उपायुक्त,समाज कल्याण विभाग,लातुर यांचे बृहत आराखडा मान्यता आदेश जा.क्र.२६५ दि. ०१.०२.२०२४
१८. मा.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,नांदेड यांचे प्रशासकिय मान्यता आदेश क्र.४७७ दि.३१.१०.२०२५ व ४८३ दि.२०.११.२०२५.
१९. मा.प्रशासक तथा मुख्य.कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,नांदेड यांची मान्य टिप्पणी क्र. 35 दि. 03.02.2026.

---

ज्याअर्थी संदर्भीय क्र. 14 अन्वये, अनु.जाती व नवबौध्द घटाकांच्या वस्तींचा विकास करणे योजनेअंतर्गत, सन 2025-26 या वित्तीय वर्षात सदर योजनेस रक्कम रु.6075.60 लक्ष नियतव्यय मंजुर करण्यात आलेला आहे.

ज्याअर्थी संदर्भीय क्र.19 अन्वये, मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,नांदेड यांनी ठरावाद्वारे अनु.जाती व नवबौध्द घटाकांच्या वस्तींचा विकास करणे योजनेअंतर्गत, सन 2025-26 मधील उपलब्ध होणा-या तरतुदीतुन, ग्राम पंचायत/वस्ती/कामे/निधी यांची निवड केलेली आहेत. त्याअर्थी, क्र.4 अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, अति.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड, अनु.जाती व नवबौध्द घटाकांच्या वस्तींचा विकास करणे



Scanned with OKEN Scanner

योजनेअंतर्गत, संदर्भीय 18 अन्वये सन 2025-26 च्या तरतुदीतून रक्कम रु.2774.00 व 1989.49 लक्ष च्या अशा एकूण 4763.49 लक्ष रक्कमेच्या 778 विकास कामांना प्रशासकिय मान्यता यापुर्वीच प्रदान केलेली आहे. तसेच मंजुर नियतव्ययाच्या अधिन राहुन रक्कम रु.477.50 लक्ष च्या एकूण 58 विकास कामांना खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून, कामनिहाय प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.क्र. | तालुका | ग्रा.पं.चे नाव | वस्तीचे नाव | लोकसंख्या | कामाचे स्वरुप | रक्कम (रु.लक्ष) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | नांदेड | विष्णुपूरी | फुले नगर | 119 | सी.सी.रस्ता | 7.00 |
| 2 | नांदेड | विष्णुपूरी | रामजी आंबेडकर नगर | 125 | सी.सी.रस्ता | 4.50 |
| 3 | नांदेड | विष्णुपूरी | संत रविदास नगर | 134 | सी.सी.रस्ता | 7.00 |
| 4 | बिलोली | हिप्परगामाळ | साठे नगर | 230 | सी.सी.रस्ता | 5.00 |
| 5 | बिलोली | हिप्परगामाळ | आंबेडकर नगर | 202 | विद्युतीकरण | 10.00 |
| 6 | बिलोली | आदमपूर | रमाई नगर | 52 | सी.सी.रस्ता | 5.00 |
| 7 | बिलोली | सावळी | आंबेडकर नगर 1 | 201 | सी.सी.रस्ता | 5.00 |
| 8 | धर्माबाद | येल्लापुर | डॉ.बाबासाहेब अंबेडगरनगर अण्णाभाऊ साठेनगर | 190 | विद्युतीकरण | 10.00 |
| 9 | धर्माबाद | दिग्रस | आंबेडकर नगर | 162 | विद्युतीकरण | 14.00 |
| 10 | धर्माबाद | दिग्रस | अण्णाभाऊ साठे नगर | 200 | सी.सी.रस्ता | 10.00 |
| 11 | देगलुर | बिजलवाडी | डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर | 325 | विद्युतीकरण | 17.00 |
| 12 | देगलुर | बिजलवाडी | डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर | 325 | पेव्हरब्लॉक | 12.00 |
| 13 | देगलुर | कावळगुडा | रमाई वस्ती | 95 | विद्युतीकरण | 10.00 |
| 14 | देगलुर | बिजलवाडी | आंबेडकर नगर | 74 | सी.सी.रस्ता | 5.00 |
| 15 | देगलुर | बिजलवाडी | नई आबादी | 223 | विद्युतीकरण | 18.00 |
| 16 | बिलोली | बेळकोणी (खु) | आंबेडकर नगर | 171 | पेव्हरब्लॉक | 7.00 |
| 17 | बिलोली | बेळकोणी (खु) | रमाई नगर | 260 | विद्युतीकरण | 8.00 |
| 18 | बिलोली | सगरोळी | आंबेडकर नगर 1 | 190 | सी.सी.रस्ता | 4.50 |
| 19 | बिलोली | सगरोळी | आंबेडकर नगर 2 | 191 | सी.सी.रस्ता | 9.50 |
| 20 | बिलोली | सगरोळी | साठे नगर 1 | 174 | सी.सी.रस्ता | 2.00 |
| 21 | बिलोली | सगरोळी | साठे नगर 2 | 178 | सी.सी.रस्ता | 4.50 |
| 22 | बिलोली | सगरोळी | पोचमपहाड वस्ती | 235 | सी.सी.रस्ता | 2.50 |
| 23 | बिलोली | लोहगाव | भास्कर नगर | 285 | विद्युतीकरण | 10.00 |
| 24 | नायगाव | आलुवडगाव | अ.साठे नगर | 58 | सी.सी.रस्ता | 10.00 |
| 25 | बिलोली | डोणगाव (बु) | लहूजी नगर | 292 | विद्युतीकरण | 10.00 |
| 26 | बिलोली | नागनी | आंबेडकर नगर | 167 | विद्युतीकरण | 10.00 |
| 27 | बिलोली | अटकळी | आंबेडकर नगर 1 | 202 | सी.सी.रस्ता | 10.00 |
| 28 | नांदेड | वाडी बु. | श्रमसाफल्य नगर | 154 | सी.सी.रस्ता | 10.00 |
| 29 | नांदेड | वाडी बु. | वेदांत नगर | 159 | सी.सी.रस्ता | 5.00 |



Scanned with OKEN Scanner

| अ.क्र. | तालुका | ग्रा.पं.चे नाव | वस्तीचे नाव | लोकसंख्या | कामाचे स्वरुप | रक्कम (रु.लक्ष) |
|---|---|---|---|---|---|---|
| 30 | बिलोली | बोळेगाव | आंबेडकर नगर 1 | 315 | पेव्हरब्लॉक | 11.00 |
| 31 | बिलोली | बोळेगाव | आंबेडकर नगर 2 | 247 | पेव्हरब्लॉक | 11.00 |
| 32 | बिलोली | चिरली | साठे नगर | 151 | सी.सी.रस्ता | 5.00 |
| 33 | बिलोली | चिरली | साठे नगर | 85 | सी.सी.रस्ता | 5.00 |
| 34 | बिलोली | चिरली/ टाकळी | आंबेडकर नगर | 80 | सी.सी.रस्ता | 7.00 |
| 35 | नायगाव | शेळगाव (गौरी) | संत रोहिदास नगर | 210 | सी.सी.रस्ता | 5.00 |
| 36 | हिमायतनगर | सिबदरा | आबेडकर नगर | 118 | सी.सी.रस्ता | 8.00 |
| 37 | बिलोली | सावळी | आंबेडकर नगर 2 | 40 | सी.सी.रस्ता | 10.00 |
| 38 | नांदेड | तळणी | रामजी आंबेडकर नगर | 310 | पेव्हरब्लॉक | 10.00 |
| 39 | नांदेड | कासारखेडा | माता रमाई नगर | 232 | सी.सी.रस्ता | 5.00 |
| 40 | नांदेड | कासारखेडा | महत्मा गौतम नगर | 152 | सी.सी.रस्ता | 5.00 |
| 41 | देगलुर | रमतापूर | नई आबादी | 113 | विद्युतीकरण | 4.50 |
| 42 | देगलुर | शिळवणी | आंबेडकरनगर | 177 | विद्युतीकरण | 22.00 |
| 43 | देगलुर | गवंडगाव | आंबेडकर नगर | 112 | विद्युतीकरण | 8.00 |
| 44 | देगलुर | गवंडगाव | जुनी वस्ती | 74 | विद्युतीकरण | 5.00 |
| 45 | देगलुर | नरंगल | रमाई नगर | 154 | विद्युतीकरण | 8.00 |
| 46 | देगलुर | शिवनी | अण्णाभाऊ साठेनगर | 143 | विद्युतीकरण | 18.00 |
| 47 | देगलुर | शिवनी | साहित्यरत्न अण्णाभाऊ साठेनगर | 28 | विद्युतीकरण | 9.50 |
| 48 | देगलुर | शिवनी | आंबेडकरनगर | 137 | सी.सी.रस्ता | 8.00 |
| 49 | देगलुर | टाकळी (ज) | अण्णाभाऊ साठेनगर | 558 | विद्युतीकरण | 5.00 |
| 50 | लोहा | कापसी खु. | साठे नगर | 176 | पेव्हरब्लॉक | 10.00 |
| 51 | लोहा | दगडगाव | माता रमाई नगर | 198 | पेव्हरब्लॉक | 5.00 |
| 52 | लोहा | दगडगाव | पंचशिल नगर | 152 | पेव्हरब्लॉक | 5.00 |
| 53 | नायगाव | टाकळी बु | अण्णाभाऊ साठे नगर | 302 | पाणी पुरवठा | 5.00 |
| 54 | नायगाव | टाकळी बु | अण्णाभाऊ साठे नगर | 302 | समाजमंदिर दुरूस्ती | 1.00 |
| 55 | हदगाव | वडगाव (बु) | गौतमनगर | 180 | पेव्हरब्लॉक | 10.00 |
| 56 | देगलुर | आमदापूर | वाढीव वस्ती | 184 | सी.सी.रस्ता | 8.00 |
| 57 | बिलोली | बडूर | रमाई नगर | 109 | विद्युतीकरण | 12.00 |
| 58 | देगलुर | रामपूर हो | अ.साठे नगर | 52 | सी.सी.रस्ता | 5.00 |
| 59 | नांदेड | वानेगांव | अण्णाभाऊ साठे नगर | 175 | पेव्हरब्लॉक | 4.00 |
| | | | | | | **477.50** |

**अटी व शर्ती :-**

१. या योजनेअंतर्गत घेण्यात येणारे पोहोच रस्ते गावातील मुख्य रस्त्यापासून जिथे पर्यंत अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्त्या आहेत तिथे पर्यंत घेण्यात यावे.

२. ज्या ग्रामपंचायतीने समाज मंदिर इमारत बांधकाम प्रस्तावित केले आहे तेथे यापूर्वी समाज मंदिर नसल्याची खात्री गटविकास अधिकारी यांनी करावी व ग्रामपंचायतीच्या मालकीची जागा अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीमध्ये असल्याबाबत खात्री करूनच



Scanned with OKEN Scanner

रक्कम वितरीत करण्यात यावी. तसेच समाज मंदिराचे बांधकाम शासनाने विहित केलेल्या रु. ७.०० लक्ष च्या टाईप प्लॅन नुसार करा यावे. जर या आदेशान्वये मंजुर निधी कमी असल्यास उर्वरित निधी संबंधित ग्राम पंचायतीने स्वनिधीतुन खर्च करून बांधकाम पूर्ण करा

३. समाज मंदिराच्या बांधकामासाठी जागा निश्चित करण्याची जबाबदारी गट विकास अधिकारी व उप अभियंता बांधकाम उप विभाग व कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद यांची राहील. याशिवाय एकाच गावात एकापेक्षा अधिक दलित वस्त्या असल्यास समाज मंदिर एकच असावे व सर्वांसाठी सोयीस्कर असे मध्यवर्ती ठिकाणी असावे याचीजबाबदारी संबंधित गट विकास अधिकारी पंचायत समिती व संबंधित ग्राम पंचायतीची राहील.

४. गट विकास अधिका-याने कामे सुरू करण्यापुर्वी तेथिल परिसराची छायाचित्रे घ्यावीत, काम पुर्ण झाल्यानंतर त्या परिसराची पुण्हा छायाचित्रे घ्यावित व त्याच्या प्रती संचालक,समाज कल्याण अधिकारी,मुख कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,व सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण,नांदेड यांचेकडे पाठविण्यात यावीत यासाठी लागणारा खर्च योजनेच्या अनुदानातुनच करावा.

५. कामावर प्राथमिक नियंत्रण पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, संबंधित उप अभियंता व जिल्हा परिषदेचे कार्यकारी अभियंता यांच्याकडे राहील. कोणत्याही परिस्थितीत कामे मंजुर केल्यापासून एक वर्षाच्या आत संबंधित ग्राम सेवकाच्या सहाय्याने ग्राम पंचायती मार्फत पुर्ण करण्याची जबाबदारी त्या त्या तालुक्याच्या गट विकास अधिकारी यांची राहील. ज्या गावांत/वस्तीत यापुर्वी मंजूर करण्यात आलेले काम अपूर्ण असल्यास, कामात अपहार असल्यास तेथे नवीन कामे मंजूर करण्यात येत नाही. तथापी एखादया गावात / वस्तीत यापूर्वीचे काम अपूर्ण असताना नवीन काम मंजूर झाले असल्यासते रद्द समजण्यात यावे किंवा सदरील अपुर्ण काम पुर्ण झाल्या नंतर नवीन कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात यावे.

६. ज्या ग्रामपंचायतीमध्ये अनु.जाती व नवबौध्द घटकांच्या एका पेक्षा जास्त वस्त्यांमध्ये कामे प्रस्तावित केलेली आहेत त्या गावात एकापेक्षा जास्त अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्त्या असल्या बाबत व त्यांच्या एकुण संख्ये बाबत गटविकास अधिकारी यांनी प्रमाणित करुन द्यावे.

७. बृहत आराखडा २०२३-२४ ते २०२७-२८ मध्ये नमुद प्रमाणे व आज रोजीची प्रत्यक्ष लोकसंख्या याबाबतची आकडेवारी संबंधित गट विकास अधिकारी यांनी प्रमाणित करुन समाज कल्याण विभाग,जिल्हा परिषद,नांदेड येथे सादर केल्या नंतरच संबंधित तालुक्याचा / वस्तीचा निधी वितरण आदेश निर्गमीत करण्यात येतील.

८. प्रस्तावा सोबत गविअ/ग्रामसेवक/गटविकास अधिकारी यांनी अनु.जातीच्या वस्तीत असलेली अनु.जातीची लोकसंख्या व पूर्वी दिलेला लाभ यांच्या माहितीचे प्रमाणपत्र जोडावे.

९. बृहत आराखडा २०२३-२४ ते २०२७-२८ मध्ये नमुद प्रमाणे वस्त्यांच्या लोकसंख्ये संबंधी कुठलीही अनियमीतता झाल्यास व लेखा आक्षेप निघाल्यास व वसुली निघाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी हि संबंधित ग्रामसेवक व गट विकास अधिकारी यांची राहिल.

१०. कामास प्रत्यक्ष सुरुवात करण्यापूर्वी संबंधीत ग्रामपंचायतमध्ये एका पेक्षा जास्त दलित वस्त्या आहेत व तेथे काम करणे आवश्यक आहे याची खात्री करुनच कामास प्रारंभ करण्यात यावा व त्यास पहिल्या हप्त्याची २५ टकके रक्कम वर्ग करण्यात यावी.

११. मंजूर करण्यात आलेल्या अनुदानापेक्षा अंदाजपत्रकाप्रमाणे लागणारी जादाची रक्कम ग्रामपंचायतीने स्वतःच्या निधीतून खर्च करुन अंदाजपत्रकाप्रमाणे काम पूर्ण करून घेण्याची जबाबदारी गटविकास अधिकारी, उपअभियंता बांधकाम विभाग, सरपंच, ग्रामसेवक यांची राहील. कामावर झालेला खर्च आणि कामाच्या प्रगतीचा अहवाल गटविकास अधिकारी यांनी समाज कल्याण विभागास दरमहा सादर करणे बंधनकारक आहे.

१२. मंजुर केलेल्या कामाच्या खर्चाबाबत भविष्यात लेखा आक्षेपाद्वारे किंवा इतर कोणत्याही कारणांमुळे वसूली प्रस्तावित झाल्यास संबंधीत गटविकास अधिकारी, उप अभियंताबांधकाम विभाग आणि ग्रामसेवक यांचेकडून एक रक्कमी वसूली करण्यात येईल.

१३. कामावर झालेल्या खर्चाबाबत लेखा आक्षेप, लेखा तपासणी व शासनास वेळोवेळी सादर करावयाची माहिती सादर करण्याची जबाबदारी गटविकास अधिकारी यांची राहील.

१४. ज्या कामासाठी अनुदान मंजूर करण्यात आले ते अनुदान त्याच कामासाठी वापर करावा तसेच सदर काम अनुसूचित जातीच्या वस्तीतच करण्यात यावे. या कामी दिलेल्याअनुदानाचा गैरवापर केल्यास अथवा काम अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीत न केल्यास ते तपासणीमध्ये अथवा तक्रारीवरुनअसे निदर्शनास आल्यास याबाबत संबंधीत ग्रामसेवक, कनिष्ठ अभियंता, गटविकास अधिकारी यांना जबाबदार धरून पुढील प्रशासकीय व कायदेशीर कार्यवाही नियमानुसार करण्यात येईल व पूर्ण रक्कम गटविकास अधिकारी, कनिष्ठ अभियंता व ग्रामसेवन यांचे कडून वसूल करण्यात येईल..

१५. प्रस्तावित ठिकाणी इतर कोणत्याही शासकीय अथवा जि.प/पं.स/ग्रा.पं यांच्या स्व उत्पन्नातुन योजनेमधून काम झाले नसल्याची खात्री करुनच गटविकास अधिकारी यांनी कार्यारंभ आदेश द्यावेत.

१६. काम पूर्ण झाल्यानंतर त्या ठिकाणी हे काम सामाजिक न्याय विभागाच्या अनुसूचित जाती उप-योजनेंतर्गत पूर्ण करण्यात आले आहे असे वाक्य कोनशिलेवर कोरुन अथवा विहित फलक बसविण्यात यावा तसेच त्यावर कंत्राटदाराचे नांव, रक्कम स्वरूप व काम सुरु व पूर्ण केल्याचा दिनांक हे देखील दर्शविण्यात यावा.



Scanned with OKEN Scanner

...र्भीय क्र. (08) मधिल निर्देश 2 नुसार घोषित दलित वस्त्यांचे GIS Mapping (Geo Tagging) करणे बंधनकारक आहे.त्यानुसार ...विकास अधिका-याने कामे सुरू करण्यापुर्वी संबंधित वस्तीचे GIS Mapping झाले असल्या बाबत खात्री करुन घ्यावी. असे न ...ल्यास उर्वरित 10 टक्के रक्कमेचे देयक अदा करता येनार नाही.

. संदर्भीय क्र.(10) नुसार, शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार वस्तु व सेवा कराची रक्कम अंतिम देयकातून कपात करावी व शासन खाती जमा करण्याची जवाबदारी व्यक्तीश: गविअ यांची राहील.

१९. संदर्भीय क्र.(10) नुसार, शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार अंतिम देयकातून आयकर कपात करावी व आयकर कपातीची रक्कम शासन खाती जमा करण्याची जवाबदारी व्यक्तीश: गविअ यांची राहील.

२०. संदर्भीय क्र.(10) नुसार, शासनाने वेळोवेळी टिलेल्या निर्देशानुसार कंत्राटी कामाच्या मुल्याच्या दराने विमा उतरवण्यात यावा व विम्याची रक्कम शासन खाती जमा करण्याची जवाबदारी व्यक्तीश: गविअ यांची राहील.

२१. ग्राम विकास व वित्त विभागाच्या निर्देशानुसार ई-निविदा पध्दतीचा अवलंब करावा.

२२. सदर योजने अंतर्गत घेण्यात येणारे नाली बांधकाम हे बंद स्वरुपाचे म्हणजेच भूमीगत करणे बंधनकारक आहे.

२३. सदर निधी हा २०२५-२६ या वित्तीय वर्षातील असल्यामुळे वरील प्रमाणे मंजुर केलेली कामे ३१ मार्च २०२७ किंवा लगतच्या वर्षाअखेर पूर्ण करुन निधी खर्च करण्याची जबाबदारी संबंधित तालुक्यातील गट विकास अधिकारी यांची राहिल.

२४. तसेच सन २०२३-२४ ते २०२७-२८ या पंचवार्षीक बृहत आराखड्यामध्ये वस्ती निहाय शिल्लक निधीचा तपशिल नमुद केला आहे. त्यानुसार संबंधित वस्तीचा प्रशासकिय मान्यतेद्वारा मंजुर निधी हा बृहत आराखड्यामध्ये असलेल्या शिल्लक निधी पेक्षा जास्त असल्यास (अतिप्रदान न होण्याकरिता) संबंधित वस्तीला निधी अदा करण्यात येउ नये.

6/2/26

**अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद,नांदेड.**

**प्रतिलिपी.**

१. मा. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, नांदेड यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना माहितीस्तव सविनय सादर.
३. मा. उपआयुक्त (नाहस) समाज कल्याण संचालनालय, म.रा.पुणे-1 यांना माहितीस्तव सादर.
४. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जि.प. नांदेड यांना देवून कळविण्यात येते की, आदेशातील मंजूर कामांची 90% रक्कम संबंधीत गटविकास अधिकारी यांना त्वरीत वर्ग करावी.
५. कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग (दक्षिण/उत्तर) जि.प.नांदेड यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
६. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा जि.प. नांदेड यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.
७. जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव.
८. गटविकास अधिकारी, पंचायत समिती................ यांना आदेशातील अटीचे काटेकोरपणे पालन करुन कामे पूर्ण करून घेण्याच्या कार्यवाहीस्तव.
९. उप अभियंता, बांधकाम विभाग, पाणी पुरवठा उपविभाग..........जिल्हा परिषद, नांदेड यांना आदेशातील अटीचे काटेकोरपणे पालन करून काम करुन
१०. सरपंच/ ग्रामसेवक, ग्रामपंचायत (संबंधित) ता....................जि.नांदेड यांना आदेशातील अटीचे काटेकोरपणे पालन करुन कामे पूर्ण करण्यात यावीत.

——स्वा——

**अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद,नांदेड.**



Scanned with OKEN Scanner